# बोटातून कागदावर शब्द सांडले

---------------------------------------------

बोटातून कागदावर शब्द सांडले,

दु:खाने कागदावर गझल मांडले.

---------------------------------------------

वाळूतला दगड देव होवून बसला,

लुच्चा माणूस गुरु होवून बसला .

---------------------------------------------

तुझ्या कडे यायला निघालो,

सवयीने प्यायला निघालो .

---------------------------------------------

स्वप्नात तुझी भेट अशक्य होती,

सर्व स्वप्ने आज निद्राधीन होती.

---------------------------------------------

खंजीर मारले स्वप्नात,

घायाळ केले प्रत्यक्षात.

---------------------------------------------

डोळे दिले स्वप्नात,

आंधळा केला उजेडात.

---------------------------------------------

- विजय जोशी